**समान परिनियम, समान संहिता, विविध अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, अर्हता व शासकीय अधिसूचनेचे मसुदे (Draft) तयार करण्यासाठी समितीचे गठन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र. - संकीर्ण २०१६/प्र.क्र. ३४७/१६/विशि-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ०६ ऑगस्ट, २०१६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मध्ये तसेच प्रस्तावित महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे विधेयक क्र. १६ मध्ये समान परिनियम, प्रमाण संहिता, विविध अधिकाऱ्यांच्या नियुक्ती, अर्हता व राजपत्रात प्रसिध्द करावयाचे आदेश इत्यादीबाबतच्या तरतूदींचा अंतर्भाव आहे.

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८ (३) मध्ये "या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार राज्यातील समान मानके साध्य करण्यासाठी आणि ती कायम राखण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेव्दारे विद्यापीठाचे अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग आणि (राज्य शासन, केंद्र सरकार आणि स्थनिक प्राधिकरणांकडून व्यवस्थापन करण्यात येत असलेली महाविद्यालये व परिसंस्था खेरीजकरुन इतर) संलग्न महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग, त्यांची निवड, अभिक्रम आणि प्रगत प्रशिक्षण, क्षेत्र अनुभव, प्रतिनियुक्ती व नियुक्ती करण्याची रीत व पध्दती, अतिरिक्त ठरलेले अध्यापक व कर्मचारी सामावून घेणे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यातील व्यक्तींसाठी पदे राखून ठेवणे, त्यांची कर्तव्ये, कार्यभार, वेतन, भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे लाभ व इतर लाभ, वर्तणूक व शिस्तविषयक बाबी, सेवेच्या इतर शर्ती यासंबंधी प्रमाण संहिता विहित करु शकेल. संहितेमध्ये संलग्न महाविद्यालये व परिसंस्था यांचे अनुदानित किंवा विनाअनुदानित असे स्वरुप लक्षात घेता, अशी संहिता विहित करण्यात आल्यानंतर संहितेमधील तरतुदी अधिभावी ठरतील आणि या अधिनियमान्वये करण्यात आलेले परिनियम, आदेश आणि विनियम यात करण्यात आलेल्या तरतुदी संहितेध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात त्या संहितेतील तरतूदींशी, जेथवर विसंगत असतील तेथवर, विधिअग्राहय असतील" असा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. त्यामुळे या संबंधीची प्रमाण संहिता तयार करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३. प्रस्तावित कायद्याच्या कलम ७२ मध्ये एकरुप परिनियम तसेच राजपत्रात प्रसिध्द करुन ते विहित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाने एकरुप परिनियम करण्याची प्रक्रिया करणे महत्वाचे झाले आहे.

४. याशिवाय अधिनियमामध्ये विविध ठिकाणी अधिकाऱ्यांची असणारी अर्हता, अनुभव इत्यादी बाबत राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विहित करण्यात येईल अशा प्रकारची तरतूद आहे. त्यामुळे अशा सर्व अर्हता व अनुभव तसेच इतर बाबींचे आदेश विहित करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. आगामी काळात सदर विधेयक विधानमंडह अधिवेशनात मंजूर होऊन नवीन कायदा अस्तित्वात येण्याची शक्यता आहे. सदर कायदा मंजूर झाल्यास त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने समान परिनियम, प्रमाण संहिता, समान अर्हता व राजपत्रात प्रसिध्द करावयाचे इतर आदेश इत्यादी संबंधीची स्पष्टता असणे आवश्यक आहे, ही बाब लक्षात घेता उक्त विषयावर कार्यवाही करण्यासाठी व त्यानुषंगाने आवश्यक ते मसुदे (Draft) शासनास सादर करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागात काम केलेल्या प्रदीर्घ अनुभव असलेल्या तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या एका समितीचे गठन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे खालील नमूद अनुभवी व तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या समितीचे गठन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. आर. एस. माळी, माजी कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | अध्यक्ष |
| २) | श्री. अनिल राव, सेवानिवृत्त प्राचार्य, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | सदस्य |
| ३) | श्री. विलास सपकाळ, माजी कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर | सदस्य |
| ४) | श्री. एस. के. माळी सेवानिवृत्त कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ५) | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | सदस्य |
| ६) | श्री. बी. बी. पाटील, कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | सदस्य |
| ७) | श्रीमती परवीन सैयद, विधी अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | सदस्य |
| ८) | डॉ. सुधाकर बोकेफोडे, माजी उपकुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | सदस्य |
| ९) | डॉ. राजेंद्र कांकरीया, सेवानिवृत्त कुलसचिव | सदस्य |
| १०) | श्री. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ११) | प्रा. जोगेंद्रसिंग विसेन, प्राचार्य, दयानंद महाविद्यालय, लातूर | सदस्य |
| १२) | श्री. आनंद मापुसकर, शिक्षण तज्ञ | सदस्य |
| १३) | संचालक, उच्च शिक्षण, पुणे | समन्वयक |
| १४) | उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |

उपरोक्त समितीने आवश्यकतेनुसार समान परिनियम, प्रमाण संहिता, अर्हता व राजपत्राव्दारे प्रसिध्द करावयाच्या आदेशासंबंधी उपसमित्यांचे गठन करुन आपला अहवाल ३ महिन्यात शासनास सादर करावा.

उपरोक्त समिती/उपसमित्यांनी आपल्या बैठका समिती सदस्यांच्या सोयीनुसार अकृषी विद्यापीठांत घेण्यात याव्यात. याबाबतची सूचना संबंधीत विद्यापीठांना किमान ८ दिवसांपूर्वी देण्यात यावी.

समिती/उपसमितींमधील सदस्यांचे आवश्यक ते मानधन व अनुज्ञेय भत्ते त्या त्या विद्यापीठांकडून तात्काळ अदा करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८०८१०४८१४८८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सिध्दार्थ खरात)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. मंत्री (उ.व.तं.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (उ.व.तं.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.
४) सर्व संबंधित समिती पदाधिकारी (टपालाने)
५) मा. प्रधान सचिव (उ.व.तं.शि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) उपसचिव (विशि/मशि/तांशि/साशि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती.